सत्र खटला क्रमांक१२५/२०१५
शासन वि श्रीकिशन व इतर
नि.क्र.९६

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची जबानी**

**मी याव्दारे शपथेवर सत्य निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| माझे नांव | – | डॉ.शिवाजीराव श्रीरंगराव भिसे |
| माझे वय | – | ७१ वर्षे धंदा– वैद्यकिय व्यवसाय व शेती |
| राहण्याचे ठिकाण | – | भोकरंबा ता. रेणापूर जि. लातूर |

**अभियोग पक्षातर्फे सरतपासणी श्री व्ही.व्ही.देशपांडे, सरकारी वकिल यांच्या मार्फत**

०१. भोकरंबा शिवारा मध्ये आमची गट क्र.२६८ ही शेत जमीन आहे. घटना कालावधी मध्ये मी लातूर येथे राहत होतो. सदर शेत जमीन त्यावेळी बटईने दिली होती. पांडूरंग शेवाळे, हणमंत गोरे, बालाजी कांबळे यांना त्या प्रमाणे बटईने दिले होते. शेता शेजारी आरोपी श्रीकिशन आणि त्यांची दोन मुले यांची शेती आहे. त्यांनी जिल्हा परिषद शाळेच्या जागेवरील कंपाउड पाडून त्यावर अतिक्रमण केले होते. दि.२५.१०.२०१६ रोजी गावच्या ग्राम सभे मध्ये अतिक्रमण काढणे करीता ठराव मांडला होता. त्या संदर्भात मी मा. उच्च न्यायालय, खंडपिठ औरंगाबाद येथे जनहित याचीका देखील केली होती. त्याचा राग मना मध्ये धरुन आरोपी बटईदारांना माझी शेती कसू देत नव्हते. बटईदार त्यामुळे मला म्हणाले की, मी हजर राहिलो तरच त्यांना शेत नांगरता येईल.

०२. दि.०३.०६.२०१९ रोजी रात्री ८.०० वाजता मी माझे बंधू मोहन व पुतणे मदन, आमित आणि विश्वजीत असे सदर बटईदारां बरोबर शेता मध्ये आमचा घरचा ट्रक्टर व गावातील महमंद रफि शेख याचा ट्रक्टर घेवून शेता मध्ये गेलो. गावातील शंकर गोरे, मतीन शेख, राजाभाऊ गोरे, जनार्धन गोरे, नानासाहेब गोरे, धनराज पवार असे लोक देखील आमच्या सोबत होते. त्यावेळी ट्रक्टरचा प्रकाश व

माझ्या आणि अमितच्या हातामध्ये असलेल्या बॅट्रीचा प्रकाश होता.

०३. प्रकाशा मध्ये आम्हाला आरोपी हाता मध्ये हत्यारे घेवून उभारल्याचे दिसले. श्रीकिशनच्या हाता मध्ये कु–हाड व काठी होती, अमोलकडे लांब पात्याचा चाकू, स्वप्नीलच्या हातात मोटार सायकलची चेन व काठी वगैरे होते. शेता मध्ये प्रवेश केल्या केल्या त्यांनी आमच्यावर हल्ला केला. अमोलने विश्वजीतच्या पोटा मध्ये चाकूने भोसकले. मदन घरचा ट्रक्टरवर होता त्याने वाचवण्या करीता खाली उडी मारली. मतीन आणि शंकर देखील त्याच्या बरोबर धावले. श्रीकिशन यांनी मदन आणि त्यांचे डोळयावर मिरची पावडर टाकली. मतीन आणि शंकर यांनी अमोल यास बाजूला काढून मोटार सायकलवर घेवून गेले. आरोपींनी कु–हाड, काठी व चेनने बटईदार पांडूरंग शेवाळे यास मारहाण केली. श्रीकिशनने कु–हाडीने व इतर आरोपींनी काठी आणि चेनने मारहाण केली. त्या मुळे पांडूरंग चक्कर येवून जमीनीवर पडला.

०४. त्या दरम्यान अमोल चाकूसह माझ्या जवळ आला आणि मला खाली पाडले. माझ्या पाठीवर बसून तुझा जिव घेतो आसे म्हणाला व गळयाला चाकू लावला. बालाजी आणि अमित यांनी त्याला बाजूला ओढायला सुरुवात केली परंतू त्याने अमितच्या दंडाचा चावा घेतला. मी उभा राहत असताना अमोलने माझ्या चेह–यावर मिरची पावडर मारली. बालाजी आणि अमित यांनी मला शेता बाहेर नेले. मी आणि मदन यांनी आजू बाजूच्या घरातून पाणी मागून डोळे धुतले.

०५. मोहन, शंकर आणि मतिन हे विश्वजीतला लातूरला घेवून गेल्याचे समजले. मी, मदन, अमित, पांडूरंग वगैरे गाडीतून रेणापूर येथे पोलीस ठाण्यात गेलो. बालाजी पाठोपाठ मोटार सायकलवर आला. पोलीसांनी वैद्यकिय उपचाराचे पत्र आम्हाला दिले. आम्ही ग्रामिण रुग्णालयात गेलो. डॉक्टरांनी औषोधोपचार केला व

एमएलसी नोंदवली. डोळयात मिरची पावडर गेल्यामुळे लातूरच्या दवाखान्यात मला व मदनला उपचारासाठी पाठवले. लातूर रुग्णालया मध्ये आमच्यावर उपचार केले. डोळे जळजळून डोके दुखत होते. मला डायबेटीस व एपीलेप्सीचा त्रास आहे त्यामुळे मला त्याचा ॲटक येईल असे वाटले. त्यामुळे मी घरी परत आलो व औषधाचा डोस घेवून झोपलो. दुपारी उशीरा जाग आली व त्यानंतर मी रेणापूर पोलीस ठाण्यात गेलो. घटनेची वर्दी मी दिली जी मला सी–५ दाखवल्या नुसार त्या खाली माझी सही असून मजकूर खरा व बरोबर आहे आणि ती **नि.क्र.९७** ला आहे.

०६. दि.०५.०६.२०१९ रोजी माझा पोलीसांनी पुरवणी जबाब नोंदविला. अगोदार देखील आरोपींनी शेता मध्ये हरभ–याचे पिक मळणीसाठी ठेवलेले असताना ते चोरुन नेले होते. त्या मध्ये त्यांच्या विरुध्द दोषारोपपत्र देखील चोरीसाठी दाखल झाले होते. सोयाबीनेचे पिक काढते वेळी देखील आरोपींनी बटईदारांना मारहाण केली होती आणि त्या बाबत बटईदाराने पोलीस ठाण्यात वर्दी दिली होती.

०७. सर्व आरोपी आज न्यायालयात हजर आहेत. (साक्षीदाराने आरोपी जागी बसलेल्या आरोपींना ओळखले. आरोपींनी त्यांची नांवे त्या प्रमाणे सांगीतले.)

**सरकारी विधिज्ञांच्या तोंडी विनंती वरुन पुढील सरतपास तहकुब करण्यात आला.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत केले.

(आर.आर.भोसले)

दिनांक १४.०८.२०२५ अतिरिक्त सत्र न्यायाधीश–१ लातूर

सत्र खटला क्रमांक१२५/२०१५
शासन वि श्रीकिशन व इतर
नि.क्र.९६

**उलट तपास आरोपीतर्फे श्री.टी.व्ही.जामदार, वकिल यांच्या मार्फत**

आरोपी विधिज्ञांच्या विनंती अर्जा वरुन उलट तपास तहकुब करण्यात आला.

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत केले.

(आर.आर.भोसले)

दिनांक १४.०८.२०२५ अतिरिक्त सत्र न्यायाधीश–१ लातूर